महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग,
तिसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

क्र. संकिर्ण-२०२५ / प्र.क्र. २९ / नोंदणी शाखा, दिनांक :- २४ जून, २०२५.

प्रति,

सर्व पुरवठादार संस्था

विषय :- गृहनिर्माण विभागाच्या रोख शाखेतील देयके, वेतनपट व सेवापुस्तके यांची बांधणी करण्याकरीता करार पध्दतीने नेमणुक करण्यासाठी दरपत्रक सादर करणेबाबत.

महोदय/ महोदया,

विषयांकित प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, गृहनिर्माण विभागाच्या रोख शाखेतील देयके, वेतनपट व सेवापुस्तके यांची बांधणी करण्याकरीता एक वर्षासाठी करार पध्दतीने नेमणुक करण्याकरीता दरकरार करण्याची बाब विचाराधीन आहे.

२. सदर करारामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव आहे -

१. वेतन देयक नोंदणी पत्रक लेदर बांधणी
२. वेतन देयकावर सोनेरी नाव
३. पुरवणी देयक बांधणी
४. वेतनपट पुस्तक बांधणी
५. सेवा पुस्तके साधी बांधणी
६. सेवा पुस्तके रेग्झीन बांधणी
७. सेवा पुस्तकावर सोनेरी नाव

उपरोक्तनुसार आपल्या कंपनी / संस्थेचे दरपत्रक / निविदा या विभागास मोहोर बंद लिफाफ्यात दिनांक २७ जून, २०२५ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत, या विभागाचे उप सचिव (नोंदणीशाखा), गृहनिर्माण विभाग, तिसरा मजला, मंत्रालय मुख्य इमारत, मुंबई - ४०००३२ या पत्त्यावर पाठविण्यात यावी. सदर मुदतीनंतर प्राप्त झालेली निविदा कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाही, याची आपण कृपया नोंद घ्यावी.

३. दिनांक २७ जून,२०२५ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत प्राप्त होणारी मोहोरबंद दरपत्रकेच दिनांक ३० जून, २०२५ रोजी दु. ४.३० वाजता या विभागाचे उप सचिव (नोंदणीशाखा) यांच्या दालनात त्यांच्या समक्ष उघडण्यात येतील. त्यावेळेस, निविदा सादर करणाऱ्या कंपनीच्या / संस्थेच्या प्रतिनिधींनी प्रत्यक्ष उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

४. विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या निविदांपैकी सर्वात कमी दर नमूद करण्यात येणाऱ्या कंपनी / संस्थेची या विभागाच्या रोख शाखेतील देयके, वेतनपट व सेवापुस्तके यांची बांधणी करण्याकरीता करार पध्दतीने नेमणुक करण्याकरीता निवड करण्यात येऊन, त्या कंपनी / संस्थेसोबत एक वर्षाचा करार करण्यात येईल.

आपला

( सुनिल वि. उकिरडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन (कृ.मा.प.)

प्रत :-

१. उप सचिव(नोंदणीशाखा), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

२. अवर सचिव(रोख शाखा), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

३. कक्ष अधिकारी(आस्थापना), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

४. निवडनस्ती.